بِسۡمِ اللّٰہِ الرَّحۡمٰنِ الرَّحِیۡمِ نَحۡمَدُہٗ وَ نُصَلِّیۡ عَلٰی رَسُوۡلِہِ الۡکَرِیۡمِ وَعَلٰی عَبۡدِہِ الۡمَسِیۡحِ الۡمَوۡعُوۡدِ
لَا اِلٰہَ اِلَّا اللّٰہُ مُحَمَّدٌ رَّسُوۡلُ اللّٰہِ
دفتر مجلس انصار اللہ بھارت
Office Of The Majlis Ansarullah Bharat
Mohallah Ahmadiyya Qadian-143516, Distt.Gurdaspur (Punjab) INDIA
Mob.9682536974, E-Mail :ansarullah@qadian.in
محلہ احمدیہ قادیان ۱۴۳۵۱۶ ضلع: گورداسپور (پنجاب)

# हजरत अपेक्षित मसीह व महदी (अ.स.) यांच्या विवेकपूर्ण उपदेशांद्वारे पवित्र कुरआनची प्रतिष्ठा, स्थान, दर्जा आणि महानता यांचे वर्णन

# विरोधकांच्या सर्व दुष्टकृतीपासून सुरक्षित राहण्यासाठी, जगासाठी आणि विशेषतः पॅलेस्टाईनच्या मुस्लिम बांधवांसाठी रमजान च्या पवित्र महिन्यात प्रार्थना करण्याचे आवाहन

सारांश प्रवचन खुतबा हजरत मिर्जा मसरूर अहमद, मसीहाचे पंचम खलीफा (अल्लाह त्यांचा सहाय्यक असो) दिनांक ७ अप्रैल २०२३, मशिद बैतुल फुतूह, यु.के.

أَشۡهَدُ أَنۡ لَا إِلٰهَ إِلَّا اللّٰهُ وَحۡدَهٗ لَا شَرِيۡكَ لَهٗ وَأَشۡهَدُ أَنَّ مُحَمَّدًا عَبۡدُهٗ وَرَسُوۡلُهٗ أَمَّا بَعۡدُ فَأَعُوۡذُ بِاللّٰهِ مِنَ الشَّيۡطٰنِ الرَّجِيۡمِ۔

بِسۡمِ اللّٰہِ الرَّحۡمٰنِ الرَّحِیۡمِ۔ اَلۡحَمۡدُ لِلّٰہِ رَبِّ الۡعٰلَمِیۡنَ۔ الرَّحۡمٰنِ الرَّحِیۡمِ۔ مٰلِکِ یَوۡمِ الدِّیۡنِ۔ اِیَّاکَ نَعۡبُدُ وَاِیَّاکَ نَسۡتَعِیۡنُ۔ اِہۡدِنَا الصِّرَاطَ الۡمُسۡتَقِیۡمَ۔ صِرَاطَ الَّذِیۡنَ اَنۡعَمۡتَ عَلَیۡہِمۡ ۬ۙ غَیۡرِ الۡمَغۡضُوۡبِ عَلَیۡہِمۡ وَلَا الضَّآلِّیۡنَ۔

तशहहुद, तआवुज आणि सुरह फातिहच्या पठनानंतर हुजूर अनवर म्हणाले,

अल्लाहने, पवित्र प्रेषितावर धर्म आणि शरीयत परिपूर्ण केली, म्हणून त्याने पवित्र कुरआन मध्ये अशी घोषणा केली:

اَلۡیَوۡمَ اَکۡمَلۡتُ لَکُمۡ دِیۡنَکُمۡ وَاَتۡمَمۡتُ عَلَیۡکُمۡ نِعۡمَتِیۡ وَرَضِیۡتُ لَکُمُ الۡاِسۡلَامَ دِیۡنًا

आज मी तुमच्या भल्यासाठी तुमचे धर्म परिपूर्ण केलेला आहे आणि तुमच्यावर माझा अनुग्रह पूर्ण केला आहे आणि तुमच्यासाठी धर्म म्हणून इस्लामची निवड केली आहे. मला तुमच्यासाठी एक धर्म म्हणून तो आवडला. त्यामुळे मुस्लिमांवर अल्लाहचा हा मोठा उपकार आहे की त्याने त्यांना एक परिपूर्ण आणि शाश्वत शरीयत दिली. हा दावा फक्त इस्लामने केला आहे आणि इतर कोणत्याही धर्माने असा दावा केलेला नाही की आता शेवटचा धर्म इस्लाम आहे. तो सर्वशक्तिमान अल्लाहचा आवडता धर्म आहे आणि जर सर्वशक्तिमान अल्लाहची प्रसन्न प्राप्त करायची असेल तर इस्लाम स्वीकारुन त्याच्या शिकवणींचे पालन केल्याशिवाय पर्याय नाही. सर्वशक्तिमान अल्लाह असे घोषित करतो की, केवळ पवित्र कुरआनची शिकवण आहे जी आता माणसाचे नैतिक आणि आध्यात्मिक मार्गदर्शन आणि विकासाचे एकमेव साधन आहे किंबहुना ही

शिकवण इतकी परिपूर्ण आहे की भौतिक विकासाच्या मार्गांसाठी देखील हीच शिकवण लाभदायक आहे.

सर्वशक्तिमान अल्लाह जेव्हा या शिक्षणाची परिपूर्णता घोषित करतो, तेव्हा त्याचा अर्थ असा होतो की सर्व मानवी क्षमता, मग ते नैतिक, आध्यात्मिक किंवा शारीरिक, केवळ पवित्र कुरआनचे अनुसरण करून प्राप्त केले जाऊ शकतात. आणि أَتْمَمْتُ सांगून हे स्पष्ट करण्यात आले की सर्व मानवी गरजा, फक्त पवित्र कुरआनद्वारे पूर्ण होऊ शकतात. अशी कोणतीही गरज नाही जी पवित्र कुरआनमध्ये समाविष्ट नाही, मग ती माणसाच्या भौतिक गरजा असोत किंवा आध्यात्मिक आणि नैतिक दर्जा प्राप्त करण्यासाठी साधन आणि पद्धती असोत.

या आयतीसह, पवित्र कुरआनने हेही घोषित केले की आता मनुष्याचे अस्तित्व या शिक्षणाशी निगडीत आहे आणि हे शिक्षण सर्व काळातील आणि सर्व जगाच्या लोकांसाठी आहे आणि पवित्र कुरआनच्या आधी प्रकट झालेल्या सर्व शिकवणी त्या विशेष काळासाठी आल्या होत्या आणि त्या विशेष कालखंडावर आधारित होत्या.

अपेक्षित मसीह (अ.स.) यांनी हे स्पष्ट करण्यासाठी देखील घोषित केले की यावरून हे सिद्ध होते की पवित्र पैगंबर (स.) यांना पाठवण्याचा उद्देश पूर्ण झाला आहे आणि तेच परिपूर्ण आणि शेवटचे प्रेषित आहेत ज्यांच्यावर हा परिपूर्ण ग्रंथ अवतरित झाला. आक्षेपार्हांचा असा आक्षेप आहे की जर (तुमचा) असा विश्वास आहे आणि तुम्ही पवित्र कुरआनला अंतिम शरियत मानतात आणि पवित्र पैगंबराला शेवटचा पैगंबर मानतात, तर हजरत अपेक्षित मसीह यांच्या दाव्याची काय गरज आहे आणि त्यांच्या आगमनाचे कारण काय? तर याचे उत्तर त्यांनी स्वतः एक ठिकाणी अशा प्रकारे स्पष्ट केले आहे की, जर तुम्ही इस्लामी शिकवणींचे पालन करत असाल तर मला येण्याची गरज नव्हती हे ठीक आहे, परंतु या काळातील सामान्य स्थिती आणि विशेषतः मुस्लिम लोकांची स्थिती जोराने अशी घोषणा करत होती की एक प्रबोधक आणि युगावताराची गरज आहे.

त्यांनी आपल्या साहित्यात, लेखनात आणि पुस्तकांमध्ये सर्वत्र म्हटले आहे की, मी पवित्र पैगंबरांच्या गुलामगिरीत त्यांच्या शरियत आणि धर्माची आणि पवित्र कुरआनची शिकवण जगात पोहोचवण्यासाठी आलो आहे. त्यासाठी अहमदिया जमाअतची स्थापना झाली आणि त्यांनी प्रदान केलेल्या साहित्यानुसार आणि त्यांनी नमूद केलेल्या कुरआनाच्या भाष्यानुसार हे कार्य अहमदिया जमाअत करत आहे आणि हे ध्येय आपण किती साध्य करत आहोत याचा विचार प्रत्येक अहमदियाने केला पाहिजे. सांघिक रूपाने हे कार्यक्रम होत आहेत; परंतु ते वैयक्तिकरित्या देखील केले पाहिजे. आणि आम्ही घेतलेल्या दीक्षेचे उद्देश तेव्हाच पूर्ण होणार जेव्हा आम्ही यानुरुप कृती कराल. आणि याकरिता आपण नेहमी पवित्र कुरआन वाचणे आणि समजून घेणे यावर भर दिला पाहिजे. यासाठी सर्वोत्कृष्ट स्त्रोत म्हणजे हजरत अपेक्षित मसीहाचे पुस्तके आणि वचने आहेत.

हुजूर अनवर म्हणाले: पवित्र कुरआनच्या गुण आणि वैशिष्टयां विषयी हजरत अपेक्षित मसीहांचे वचने मी काहीं प्रवचनांपासून प्रस्तूत करत आहे. आजही पवित्र कुरआन ची परिपूर्णतेबद्दल हजरत अपेक्षित मसीहांचे काहीं शब्द प्रस्तूत करेन.

हुजूर अनवर म्हणाले: दीक्षेच्या दहा अटींमध्ये हा घटक देखील समाविष्ट आहे की, मी (दीक्षा घेणारा) माझ्या डोक्यावर (जीवनामध्ये) पवित्र कुरआनचा शासन स्वीकार करीन. म्हणून जर आपल्यापैकी प्रत्येकाने या रमजानमध्ये या मार्गदर्शनाचे पालन करण्याचा निर्धार केला तर आम्ही केवळ आमची अध्यात्मिक प्रगती करत नसून संपूर्ण समाजाचे करणारे ठराल आणि परिणामस्वरुप तो समाज एका वृंदावनाचा समाज बनून जाईल.

हुजूर अनवर यांनी अपेक्षित मसीह (अ.स.) यांच्या संदर्भात म्हणाले की, मानवी स्वभावात जे काही भ्रष्ट होऊ शकते आणि ते किती प्रमाणात चुकीचे वागू शकतात, या सर्व चुका पवित्र कुरआनने दुरुस्त केल्या आहेत. म्हणून त्याने पवित्र कुरआन अशा वेळी अवतरित केले जेव्हा हे सर्व दोष मानवजातीमध्ये निर्माण झाले होते आणि हळूहळू मानवी स्थितीने प्रत्येक श्रद्धा आणि वाईट प्रथांमधून अशुद्धता प्राप्त केले होते आणि ही दैवीज्ञानानुसार अशा वेळी तो परिपूर्ण ग्रंथ अवतरित करणे आवश्यक होते. कारण अशा लोकांना गुन्ह्यांची आणि भ्रष्टाचाराची माहिती देणे ज्याबद्दल ते अनभिज्ञ आहेत, आणि या अनभिज्ञतेमुळे ते पापांकर्मांकडे प्रवृत्त होत असतात.

हुजूर अनवर म्हणाले की, ज्यांच्याकडे ज्ञान आणि विवेक आहे ते सामान्य माणसाच्या बरोबरीचे असू शकत नाहीत. जो शब्द ईश्वरीय शब्द आहे तो मनुष्याच्या शब्दापेक्षा श्रेष्ठ असणे अपरिहार्य आहे. दैवी ज्ञान मानवी रचनासारखे कधीच असू शकत नाही. त्यामुळे पवित्र कुरआन प्रत्येक बाबतीत परिपूर्ण असल्याचा दावा करतो आणि कोणीही त्याच्या विरूद्ध ना उभा होता आणि ना उभा होऊ शकणार. त्याचा प्रभाव या पवित्र शब्दाचे पालन करणाऱ्यांवर दिसून येतो. म्हणूनच, हे देखील कुरआनच्या शिकवणीचे वैशिष्ट्य आहे की, जे त्याचे पालन करतात त्यांनाच विलक्षण आशीर्वाद प्राप्त होतात.

अपेक्षित मसीह (अ.स.) म्हणाले की पवित्र कुरआनने आपल्या वक्तृत्व आणि तेजस्वितेला, सत्य आणि धार्मिक आवश्यकताद्वारे जाणीव करून दिली. सर्व धार्मिक सत्यांचा समावेश करुन दाखवले. प्रत्येक प्रतिस्पर्ध्यासाठी ते उचित व सत्य पुराव्यांनी व्यापलेली आहे. ज्या घटकांमध्ये भ्रष्टाचार दिसला त्याच्या सुधारणेसाठी त्याने जोर लावला. त्याने सर्व प्रकारच्या रोगांवर उपचार लिहून ठेवले आहेत. त्याने खोट्या धर्मांचा प्रत्येक भ्रम पुसून टाकला आहे. त्याने प्रत्येक आक्षेपाला उत्तर दिले आहे. असे एकही सत्य नाही ज्याचे स्पष्टीकरण दिलेले नाही. एकही शब्द विनाकारण रचला नाही. कोणतीही गोष्ट विनाकारण नमूद केलेली नाही. कोणताही शब्द कोणताही विधान अतर्क्य नाही. वक्तृत्वाला अशा स्तरापर्यंत नेले की याचे ज्ञान आणि संपदा सर्वकाळासाठी पुरेसे झाले. त्याची शिकवण अशी आहे की त्याची व्याख्या सर्व काळानुसार ज्ञान प्रदान करते. काही शब्दांत ज्ञानाची नदी ओतणारे असे ग्रंथ कोणी पाहिले आहे का? अपेक्षित

मसीह (अ.स.) ने प्रत्येक धर्माला आव्हान दिले की माझ्याकडे या मी तुम्हाला याचे गुण दाखवतो आणि जर तुम्हाला कोणाताही आक्षेप असेल तर माझ्यासमक्ष प्रस्तूत करा पण आजपर्यंत कोणीही या आव्हानाला प्रतिसाद दिलेला नाही, असे असूनही आम्हा अहमदींवर ईशनिंदेचा आरोप आहे. अपेक्षित मसीह (अ.स.) म्हणाले की, श्रद्धावंत तोच आहे जो पूर्णपणे पवित्र कुरआन चे अनुकरण करतो.

हजरत अपेक्षित मसीह म्हणाले की मोक्षप्राप्तीसाठी परमेश्वराने वारंवार सांगितले आहे की सर्वप्रथम अल्लाहला एकमेव ईश्वर स्वीकारावे आणि पवित्र पैगंबर यांना सच्चा प्रेषित समजावे. पवित्र कुरआनला अल्लाहचे ग्रंथ समजावे. पुढे अपेक्षित मसीह (अ.स.) पवित्र कुरआनाच्या प्रकटीकरणाच्या गौरवाविषयी म्हणाले की, जे लोक असा दावा करतात की ते कुरआनची उपमा आणू शकतात त्यांच्यावर देवाचा शाप आहे. पवित्र कुरआन तो दिव्य चमत्कार आहे ज्यासारखे ज्ञान आणि गुणांचे संग्रह, मानवी ज्ञान जमा करूच शकत नाही.

अपेक्षित मसीह (अ.स.) म्हणालेः जर मी पवित्र कुरआनच्या विरूद्ध वेगळा मार्ग स्वीकारला असता किंवा एखादी शिकवण रद्द केली असती किंवा पवित्र पैगंबरांचा मार्ग स्वीकारला नसता, तर ही व्यक्ती पवित्र पैगंबर (स.) शत्रू आहे, असे लोकांचे म्हणणे दुरुस्त ठरले असते. आता मी कुरआनमध्ये काहीही बदललेले नाही आणि त्यापूर्वीच्या ग्रंथातील कोणताही भाग बदलेला नाही, किंबहुना मी कुरआन आणि कुरआनच्या आज्ञा आणि पवित्र प्रेषितांच्या शुद्ध धर्माची सेवा करण्यास तत्पर आहे.

हुजूर अनवर म्हणाले की, पवित्र कुरआनची शिकवण आमच्यापर्यंत हजरत अपेक्षित मसीह यांच्याद्वारेच आली आहे. म्हणून जे लोक त्यांच्यावर आक्षेप लावतात त्यांनी हे पाहावे की त्यांनी किती चूकीचे विधान मुखातून काढले आहे. अशा लोकांना शिक्षा दिल्याशिवाय अल्लाह त्यांना सोडणार नाही.

हुजूर अनवर यांनी पवित्र कुरआनच्या अपेक्षित मसीह (अ.स.) यांच्या लिखाणातून न्याय प्रस्थापित करण्याच्या आज्ञेवर प्रकाश टाकला आणि सांगितले की ही तत्त्वे जगात शांततेची हमी आहेत. महायुद्धांमध्ये सामील असलेल्या राष्ट्रांनी हे तत्त्व समजून घेतल्यास शांतता प्रस्थापित होऊ शकते. न्याय प्रस्थापित झाला नाही तर विनाश निश्चित आहे.

पवित्र कुरआनच्या परिपूर्ण शिकवणीची घोषणा करून, अपेक्षित मसीहने (अ.स.) घोषित केले की जर कोणी कुरआनच्या विरुद्ध कोणतेही सत्य दाखवत असेल, जे त्यात नाही किंवा इतर पुस्तकात अधिक चांगल्या प्रकारे स्पष्ट केलेले आहे, तर अशा परिस्थितीत आम्ही मृत्युदंड स्वीकारण्यास तयार आहोत.

आज, कुरआन हा जगातील एकमेव ईश्वराचा शब्द आहे, ज्यामध्ये एकेश्वरवाद, दैवी आदर आणि दैवी एकत्व पूर्णपणे उपस्थित आहे, आणि कुरआन देवाला दोष देत नाही आणि

कोणतीही शिकवण जबरदस्तीने लादत नाही, आणि ते लोकांच्या बोलण्यात किंवा कृतीतील चुका दुरुस्त करते आणि प्रत्येक अराजकता आणि उपद्रवाचे दमन करते.

हुजूर अन्वर म्हणाले, की अल्लाह आम्हां सर्वांना पवित्र कुरआनला खऱ्या अर्थाने पठन करणे, समजणे आणि त्यानुसार जीवन जगण्याचे सामर्थ्य प्रदान करो. आणि त्याचे लाभ आणि वैभव रमजाननंतरही आम्हाला मिळत राहो.

प्रवचनाच्या शेवटी हुजूर अनवर यांनी रमजानमध्ये जास्तीत जास्त प्रार्थना करण्याकडे लक्ष वेधले आणि विरोधकांच्या प्रत्येक दुष्ट कृतीपासून सुरक्षित राहण्यासाठी प्रार्थना करण्याचे आवाहन केले. तसेच जगासाठी आणि विशेषतः पॅलेस्टाईनच्या मुस्लिमांसाठी प्रार्थना करण्याचे आवाहन केले.

اَلْحَمْدُ لِلّٰهِ! اَلْحَمْدُ لِلّٰهِ نَحْمَدُهٗ وَنَسْتَعِيْنُهٗ وَنَسْتَغْفِرُهٗ وَنُؤْمِنُ بِهٖ وَنَتَوَكَّلُ عَلَيْهِ وَنَعُوْذُ بِاللّٰهِ مِنْ شُرُوْرِ اَنْفُسِنَا وَمِنْ سَيِّئَاتِ اَعْمَالِنَا مَنْ يَّهْدِهِ اللّٰهُ فَلَا مُضِلَّ لَهٗ وَمَنْ يُّضْلِلْهُ فَلَا هَادِيَ لَهٗ وَنَشْهَدُ اَنْ لَّا اِلٰهَ اِلَّا اللّٰهُ وَنَشْهَدُ اَنَّ مُحَمَّدًا عَبْدُهٗ وَرَسُوْلُهٗ. عِبَادَ اللّٰهِ رَحِمَكُمُ اللّٰهُ اِنَّ اللّٰهَ يَأْمُرُ بِالْعَدْلِ وَالْاِحْسَانِ وَاِيْتَآءِ ذِي الْقُرْبٰى وَيَنْهٰى عَنِ الْفَحْشَآءِ وَالْمُنْكَرِ وَالْبَغْيِ يَعِظُكُمْ لَعَلَّكُمْ تَذَكَّرُوْنَ اُذْكُرُوا اللّٰهَ يَذْكُرْكُمْ وَادْعُوْهُ يَسْتَجِبْ لَكُمْ وَلَذِكْرُ اللّٰهِ اَكْبَرُ.